नवराष्ट्र

जनसेवा

• नेत्रतपासणी आणि मोतीबिंदूची मोफत शस्त्रक्रिया, वंचित समुदायांसाठी मोफत नेत्रसेवा पुरविणार

# लीलावतीत 'रोशनी मोतीबिंदू सेवा' हा उपक्रम सुरू

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, मुंबईतील चॅरिटेबल हॉस्पिटलच्या वतीने वंचित व्यक्तींसाठी मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याच्या उद्देशाने 'रोशनी मोतीबिंदू सेवा' हा उपक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन लीलावती हॉस्पिटलचे राजीव मेहता आणि रुग्णालयाचे सीओओ नीरज उत्तमानी आणि नेत्ररोग विभागातील डॉक्टरांचे पथकाने केले. या उपक्रमाचा उद्देश डोळ्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवताना गरजूंना १०० टक्के अत्याधुनिक नेत्र निगा सेवा प्रदान करणे हा आहे.

भारतात, मोतीबिंदू हे अंधत्व आणि दृष्टीदोषाचे प्रमुख कारण ठरत आहे, ज्यामुळे देशभरातील लाखो जीवन प्रभावित होत आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसारख्या प्रभावी उपचार पर्यायांची उपलब्धता असूनही, पुरेशी काळजी प्रदान करण्यात आणि या वाढत्या डोळ्यांच्या आरोग्याच्या समस्येचे निराकरण करण्यात ते प्रभावी ठरत नाहीत. भारतातील मोतीबिंदू उपचारासमोरील आव्हाने, प्रतिबंधात्मक उपाय आणि लक्षणांबद्दल जागरूकतेचा अभाव तसेच आर्थिकदृष्ट्या कमकुवत व्यक्तींना वेळेवर उपचार मिळत नाही, असे लिलावतीतर्फे सांगण्यात आले.




## २०० हून अधिक रुग्णांची तपासणी

रोशनी मोतीबिंदू सेवेतंर्गत आम्ही सुमारे २०० रूग्णांची तपासणी केली आहे, त्यापैकी २९ रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे. यापुढेही ५०० हून अधिक यशस्वी शस्त्रक्रिया करण्याचा आमचा मानस आहे.

## गरजू व्यक्तींना दर्जेदार अत्यावश्यक नेत्रसेवा

लीलावतीच्या संस्थापक आणि विश्वस्त चारू मेहता यांच्या रोशनी मोतीबिंदू सेवा उपक्रमाचा एक भाग म्हणून, गरजू व्यक्तींवर कोणताही अर्थिक भार येऊ न देता अत्यावश्यक नेत्रसेवा सेवा उपलब्ध होतील, एखादी व्यक्ती यासाठी पूर्वनोंदणी करु शकते आणि तज्ज्ञांच्या देखरेखीखाली तपासणी करू शकते. हा उपक्रम केवळ वैद्यकीय मदतच देत नाही तर डोळ्यांचे आरोग्य चांगले राखण्याच्या महत्वाबद्दल जागरूकता वाढवतो. या कार्यक्रमाद्वारे लीलावती हॉस्पिटलने आर्थिक अडचणींमुळे परवडत नसलेल्यांनाही दर्जेदार आरोग्यसेवा पुरविल्या जाणार आहेत.

## मोतीबिंदूमुळे ९० टक्के दृष्टीदोष आढळतो

मोतीबिंदू ही भारतातील एक मोठी समस्या ठरत आहे, ज्यामुळे ७० टक्के अंधत्व आणि ९० टक्के दृष्टीदोष आढळून येतात. या समस्येने लाखो लोक प्रभावित झाले आहेत, त्यामुळे या समस्येवर त्वरित उपचार करणे आवश्यक आहे. मोतीबिंदूचे प्रमाण कमी करण्यासाठी वेळीच निदान करणे गरजेचे आहे, उपचारांबाबत वाढलेली जागरूकता महत्त्वाची आहे. मोतीबिंदूशी संबंधित अंधत्व कमी करण्यात आणि दृष्टी सुधारण्यास मदत होऊ शकते, ज्यामुळे प्रभावित व्यक्तींच्या जीवनाची गुणवत्ता वाढू शकते, असे डॉ. निरज उत्तमानी यांनी सांगितले.